## भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४९७ प्रमाणे दाखल झालेल्या नि.क्र.०७ अर्जावरील आदेश

१. अर्जदार ऋत्विक रत्नू कांबळे यांनी कणकवली पोलिस ठाणे यांचेकडील गुन्हा क्र.२०४/२०२५ मध्ये जप्त केलेले स्वतःचे मालकीचे दुचाकी वाहन नोंदणी क्र.एमएच०७–एक्यू–७६०२, चेसिस क्र.एमबीएलएचएडब्ल्यू११११एनएचएचबी२७२८ व इंजिन क्र.एचए११इव्हीएनएचएच७३०३४ हे सुपुर्तनाम्यावर मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जात नमुद वाहन ते आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरीता वापरतात. आरोपी यांची आई वयोवृध्द व आजारी असल्यामुळे दवाखान्यात जाण्यायेण्यासाठी सदर दुचाकी वाहन वारावे लागते. तसेच, आरोपी हे मोलमजुरीच्या कामाकरीता बाहेरगावी जाण्यायेण्याकरीता सदर वाहन वापरतात. सदर वाहन हे कणकवली पोलिस ठाणे यांचे आवारात पडून आहे. सदर वाहन तसेच पडून राहिलेस त्याचे पार्ट खराब होऊन अर्जदार यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. आता सदर केसचा अंतिम निर्णय होण्यास बराच कालावधी जाणार आहे. अर्जदार हे सदर मुद्देमाल आवश्यकता असेल त्यावेळी न्यायालयात हजर करण्यास तयार आहे. अर्जदाराने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जावर विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे दाखल केले आहे व त्याद्वारे प्रस्तूत अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, जप्त मुद्देमाल दुचाकी ही सदर कामी महत्वाचा व सबळ पुरावा आहे. सदर मोटरसायकल आरोपीच्या ताब्यात दिल्यास तो भविष्यात त्रयस्थ इसमास हस्तांतरीत करु शकतो तसेच त्या वाहनाच्या रंगात, स्वरुपात व वर्णनामध्ये बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वाहन हे न्यायालयाने आरोपीच्या ताब्यात दिल्यास जप्त वाहनाची गरज भासेल त्या वेळी आरोपी ते वाहन हजर न करण्याची शक्यता आहे. सबब, प्रस्तूत अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारा तर्फे विद्वान वकिल व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तर्फे करण्यात आलेले युक्तिवाद ऐकले.

५. अर्जदाराने नि.क्र.०८ चे यादीसोबत आरोपीचा वाहन चालवण्याचा परवाना, अर्जात नमुद दुचाकी वाहनाची आरसी बुकची प्रत, तसेच सदर वाहनाच्या विम्याची प्रत हजर केलेली आहे. सदर दुचाकी वाहन हे पोलिसांनी आरोपीचे ताब्यातून जप्त केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे. प्रकरणाचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागू शकतो. त्यामुळे माझ्या मते सदर दुचाकी वाहन हे अर्जदार यास काही अटींवर तात्पुरता ताबा म्हणून देणे योग्य व न्यायाचे होईल.

६. वरील सर्व परिस्थितीवरुन असे स्पष्टपणे दिसून येते की, अर्जदार प्रस्तुत प्रकरणातील वाहनाचा तात्पुरता ताबा मिळण्यास पात्र आहे. सबब, अर्जदाराचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येतो. |
| २. | जप्त मुद्देमाल दुचाकी वाहन हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटरसायकल नोंदणी क्र. एमएच०७–एक्यु–७६०२ हे अर्जदार ऋत्विक रत्नू कांबळे यांना रुपये ८०,०००/– (अक्षरी रुपये ऐंशी हजार फक्त) एवढ्या रक्कमेच्या सुपुर्तनाम्यावर तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येतात. अर्जदाराने स्वतः सुपुर्तनामा या न्यायालयात सादर करावा. |
| ३. | अर्जदार याने वरील नमुद हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटरसायकल बाबत विक्री, गहाण अथवा इतर कुठलाही व्यवहार प्रकरण प्रलंबित असेपर्यंत करु नये तसेच सदर वाहनाच्या परिस्थितीमध्ये देखिल बदल करु नये व न्यायालयाला आवश्यक वाटल्यास वाहन न्यायालयात हजर करावे. |
| ४. | अर्जदाराने वरील वाहनाचा कोणत्याही गुन्हयात वापर करु नये. |

| | |
|---|---|
| ५. | तपासी अंमलदार, पोलिस ठाणे कणकवली यांनी वरील जप्त हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटरसायकल अर्जदार ऋत्विक रत्नू कांबळे यांच्या ताब्यात द्यावी. |
| ६. | तपासी अधिकारी यांनी सदर वाहनाचे प्रत्येकी दोन फोटो व सविस्तर पंचनामा अर्जदार यांना देण्यापुर्वी करावा. पंचनामा व फोटो तसेच सुपुर्तनामा बॉन्ड या प्रकरणात दाखल करावा. फोटोचा खर्च अर्जदार याने करावा. |
| ७. | तपासी अधिकारी यांनी वरील आदेशाचे तंतोतंत पालन करावे. |

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.08.19 18:06:22 +0530

(शुभम जी. लटुरिया)
न्यायदंडाधिकारी वर्ग १
कणकवली.

दिनांकः १९/०८/२०२५